GREENLAWNS SCHOOL , WORLI

वार्षिक परीक्षा (द्‌वितीय-सत्र २३-२४)

इयत्ता - ७ वी                                                                 पूर्णांक - ८०

दिनांक - १३-२-२४                    विषय - <u>मराठी</u>                    वेळ - २ तास

<u>सूचना</u> :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुध्द भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

<u>विभाग – अ</u>

<u>भाषा - विभाग ( अंक – ४०)</u>

प्रश्न १] खालीलपैकी <u>एका</u> विषयावर निबंध लिहा : -                                       (१०)

i) माझा आवडता छंद

ii) आपली समस्या - प्रदूषण

iii) गुलाब पुष्पाचे मनोगत

प्रश्न २] खालील दिलेल्या विषयावर पत्र लिहा :-                                       (७)

तुमच्या धाकट्या भावास नियमित व्यायाम व अभ्यासाचे महत्त्व समजावून देणारे पत्र लिहा.

प्रश्न ३ ] खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :-

एका गावात एक रानटी कुत्रा व एक गाढव यांची खूप मैत्री होती. दोघेही एकत्र फिरायचे, गप्पा मारायचे, एकमेकांना आपली सुख - दुःखही सांगायचे. एकदा काय झाले, दोघेही जंगलातून एकत्र फिरत असताना एक खूप मोठे जानवर आपल्याकडे येत असल्याचा भास गाढवाला झाला. त्याने कुत्र्याला सावध केले. कुत्राही आपले कान टवकारून कोण येत आहे ? त्याची चाहूल घेऊ लागला. ब-याच दुरून परंतु गाढवावर आपले लक्ष केंद्रित करून एक लांडगा जिभल्या चाटीत पुढे येत होता. गाढव घाबरले आणि कुत्र्याला म्हणाले, "मित्रा, हा लांडगा मला खाणार असे दिसते. आपण दोघे मिळून या संकटाशी मुकाबला करूया." कुत्रा घाबरत म्हणाला, " नको रे बाबा, मला भीती वाटते आणि हो ! त्याचं लक्ष तुझ्यावर आहे ते माझ्यावर जायला नको, तेव्हा मी या झुडपात लपतो. तुला लपता येणार नाही, तू त्याला दिसशील, तेव्हा आलेल्या संकटाला तू एकटाच सामोरा जा, धैयाने तोंड दे. मरण आले तर येऊ दे, दोघांनी एकदम मरायला नको ना ! मी जातो." गाढवाला एका क्षणात मित्राची पारख झाली. तो कुत्र्याला म्हणाला, "मूर्ख कुत्र्या, रानटीच तू! इतर कुत्र्यांचा इमानीपणा तुझ्यात कुठून येणार ? मूर्खा, माझं संरक्षण करायला मी समर्थ आहे. परंतु त्या अगोदर तुझं हे फुकटचा सल्ला देणारं तोंड रंगवतो." असे बोलून गाढवाने कुत्र्याला लाथा मारायला सुरवात केली, कुत्रा खाली कोसळला आणि गाढव वेगाने पळत सुटले. कुत्रा सावरून उठेपर्यत लांडग्याच्या तावडीत सापडला आणि प्राणाला मुकला.

प्रश्न :

i) कोणामध्ये खूप मैत्री होती ? दोघे ही एकमेकांसोबत कसा वेळ घालवायचे ?                    (२)

ii) गाढवाला कोणता भास झाला व त्यांना काय दिसले ?                                       (२)

iii) गाढवाने घाबरून कुत्र्याला काय सांगितले ?                                          (२)

iv) कुत्रा घाबरून काय म्हणाला ? (२)

v) लांडग्याच्या तावडीत कोण सापडले व कसे ? (२)

## व्याकरण - विभाग

प्रश्न ४ ] खालील दिलेल्या निर्देशानुसार उत्तरे लिहा: -

i) समानार्थी शब्द लिहा - a) खूण - b) कोनाडा - (२)

ii) विरुद्धार्थी शब्द लिहा - a) भांडण - b) पक्का - (२)

iii) लिंग बदला - a) हसरा - b) भैय्या - (२)

iv) वचन बदला - a) वाडी - b) लिपी - (२)

v) रेखांकित अविकारी शब्दाचा भेद ओळखा - (३)

१) अय्या! कमालच आहे तुझी.

२) आम्ही प्रयत्न केले म्हणून आम्ही जिंकलो.

३) टोपलीत भरपूर फळे आहेत.

vi) वाक्यातील अविकारी शब्द ओळखून लिहा. (२)

१) सूर्य डोंगरामागे गेला.

२) शाब्बास! असेच यश तुला मिळो.

## विभाग - ब

## साहित्य-विभाग (अंक-४०)

## गद्य विभाग

प्रश्न ५] अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : - (१२)

i) अमृत ने कुस्ती खेळण्यास नकार का दिला ?

ii) पंडिता रमाबाईंनी हंटर कमिशनकडे कोणती शिफारस केली? त्यांनी मुक्तीमिशन मध्ये स्त्रियांसाठी सुरू केलेल्या कोणत्याही दोन लहान उद्योगांची नावे लिहा.

iii) आईने सोनालीला कथेचा सारांश लिहायला का सांगितला?

iv) मुलाच्या मते मोठी दुखणी व छोटी दुखणी कोणती? व पाठातील मुलाला घरच्यांच्या दुःखात सहभागी व्हावे असे का वाटू लागले?

आ) एका वाक्यात उत्तरे लिहा :- (४)

i) बाबांना कोणते दुखणे होते?

ii) गावातील मुले कुठे जमली?

iii) पंडिताबाईंच्या अटीची आठवण कोणी लिहून ठेवली आहे?

iv) सोनाली वहीत लिहून ठेवत असलेल्या गोष्टी लिहा.

इ) कोण - कोणास म्हणाले ते लिहा :- (३)

i) “या मदतीची सुरुवात घरापासून करा.”

ii) “चल ये, मी तुझ्याबरोबर कुस्ती लढतो.”

iii) “निदान एक तरी.”

ई) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (३)

i) तिने आजपर्यंत कधीच ................ वाचन केले नव्हते.

ii) त्यांचे पहिले व्याख्यान ................ रानडे यांच्या घरी झाले.

iii) इसाबचे बाबा अंगणात ................ बसले होते.

उ) शब्दार्थ लिहा:- a) चीत करणे- b)आनंद गगनात न मावणे - c) हातभार लावणे- (३)

## पद्‌य विभाग

प्रश्न ६] अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : - (६)

i) भविष्यात विद्‌यार्थी कसे होणार आहेत?

ii) लेक घरात नसताना कवयित्रीची अवस्था कशी होते?

iii) संत तुकाराम महाराज भोंदू साधूंपासून स्वतःला सांभाळावे असे का म्हणतात?

आ) कवितेच्या ओळी पूर्ण करा : - (४)

i) नमस्कार माझा या ज्ञानमंदिरा ................................. चिमणपाखरा ||

इ) शब्दार्थ लिहा :- a) छंद - b) पर्वा न करणे - c) सोहळा- (३)

ई) जोड्या जुळवा : (२)

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| i) कीर्तीचा - | a) गुण |
| ii) कलेचे - | b) धन |
| iii) विद्‌येचे - | c) ध्यान |
| iv) छंद - | d) कळस |

समाप्त